| MHKO200003442024 | **नियमीत दिवाणी दावा क्रं.६१/२०२४ मधील नि. १४ खाली आदेश**<br><br>**श्रीमती कासुबाई शामराव पोवार विरुध्द श्री.किरण नामदेव पोवार.** |
|---|---|

प्रस्तुत दावा वादीने हक्काज्ञापनासाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे. वादीने प्रस्तुत दावा, दाव्यामध्ये नमुद केलेले बक्षिसपत्र व मृत्युपत्र हे बेकायदशीर व बोगस असल्याने ते वादीवर व त्यांचे हक्कावर बंधनकारक नाही असे हक्कज्ञापन जाहिर होऊन मिळावे तसेच प्रतिवादीने अन्य व्यक्तींना दावा मिळकत विक्री-तबदील करु नये अगर त्यावर कोणाचाही कसलाही कर्ज बोजा निर्माण करु नये याकरीता मनाई ताकीद व्हावी म्हणून दाखल केला आहे.

**०३.** प्रतिवादी वर नमुद खोटी व बनावट कागदपत्रे महसुल नांव नोंद होणेसाठी प्रकरण दाखल केले होते व सदरचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादीने वाद मिळकतीचे महसुल रेकॉर्डला त्यांचे नांव लावुन घेतले आहे. त्यामुळे सदर महसुल रेकॉर्डला नाव असलेचा व वादीचे वयोमानाचा व प्रकृती अस्वास्थाचा गैर फायदा घेऊन दावा मिळकतीत दांडगाव्याने वादीची कसवणुकीस हर-हरकत करीत आहे. त्यामुळे वादी यांना मुळ दाव्यामध्ये परिच्छेद क्रं. ६ नंतर ६-अ व परिच्छेद नं. ११ पोट कलम 'ब' नंतर ११-ब-१ अर्जात नमुद केल्याप्रमाणे मजकुर समाविष्ठ करणे गरजेचे आहे.

**०४.** वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रस्तुत दुरुस्ती ही दावा दाखल केल्यानंतर बदलेल्या परिस्थीतीमुळे व प्रतिवादी वादीचे वयोमान व प्रकृती स्वास्थ याचा गैरफायदा घेऊन वादीस दावा मिळकतीत कष्टमशागत व कसवणुक

करणेस हर-हरकत व अडथळा करु लागला आहे. सदर दाव्याचा गुणदोषावर निकाल लागणेस बराच कालावधी लागणार आहे. दरम्यान वादीचे मिळकतीत प्रतिवादी बेकायदेशीररित्या ताबा करुन त्यांचा ताबा सांगणेची दाट शक्यता आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

**०५.** प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.२० वर दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांच्या सदर अर्जामधील कथने चुकीची व पुर्णपणे रचनात्मक असल्याने ती प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाहीत. वादी यांनी त्यांचे मुळ दाव्यामध्ये दावा मिळकतीचा कब्जा वादी यांचेकडे असलेबाबतचे कोणतेही कथन कधीही केलेले नव्हते व नाही. परंतु वादी या सदर दुरुस्ती अर्जान्वये दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादी यांचेकडून मागणी करीत आहेत. तसेच वादीने मुळ दाव्यात मिळकतीचा कब्जा वादी यांचेकडे असलेबाबतचे कोणतेही कथन केलेले नाही. तसेच वादीने प्रतिवादी विरुध्द त्यांचे कब्जास हरकत करु नये अशी कोणतीही मागणी मुळ दाव्यामध्ये केलेली नाही. यावरुन दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादीकडे असलेचे स्पष्ट होते. तसेच वादीने दाव्यामध्ये दावा मिळकतीचा कब्जा बाबत मागणी केलेली नाही. वादी हे अर्जान्वये नवीन केस निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे संपूर्ण स्वरुप बदलणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी यांचे कोणत्याही स्वरुपात न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार असून सदरचा अर्ज नामंजूर केलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०६.** दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे संपुर्ण 'रेकार्ड' पहाता असे आढळते की, सदरचा दावा दि. ३१.०३.२०२३ रोजी दाखल केला आहे. सध्या दावा नि.क्रं. ५ च्या युक्तीवादासाठी प्रलंबित आहे. वरीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.

**०७.** दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुत मुळ दावा हा

हक्कज्ञापन व कायम मनाई मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी यांच्या कथना प्रमाणे प्रतिवादी यांनी प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचे महसुल रेकॉर्डला त्यांचे नाव लावुन घेतल्यामुळे वादी यांनी त्या अनुषंगाने दुरुस्त्या मागितल्या आहेत.

**०८.** वादी यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे वेगवेगळया दुरुस्त्या सुचविल्या आहेत. वादींना दाव्यात मागीतलेल्या दुरुस्त्या करणेस परवानगी दिलेस प्रतिवादी यांना कोणत्याही नविन दावेस सामोरे जावे लागणार नाही अथवा दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसे न केल्यास दाव्यात गुंतागुंत निर्माण होऊन दाव्याच्या न्यायनिर्णय देताना अडचण निर्माण होऊ शकते. तसेच वादीला सदर बाबी पुराव्यानिशी सिध्द कराव्या लागणार आहेत व वादीचा पुरावा अजुन सुरु झाला नसल्याने दाव्याच्या अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**०९.** अंतिमरित्या मी खालील प्रमाणे आदेश करते.

**आदेश.**

१. सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात आला.

२. अर्जात नमुद केलेल्या मजकुराच्या अनुषंगाने दुरुस्ती केवळ मंजुर करण्यात येते.

३. वादी यांनी दाव्यात तशी दुरुस्ती १४ दिवसात करावी.

VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Digitally signed by VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Date: 2025.06.10 16:38:55 +0530

दि.१०.०६.२०२५.
कळे-खेरीवडे.

(व्ही.ए.लावंड-कोकाटे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे-खेरीवडे.